**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः05.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- ग्रामीण भारताचा विकास झाला तरच विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होईल - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ग्रामीण भारत महोत्सवात प्रतिपादन.

- नियोजन प्राधिकरणांचं सक्षमीकरण करुन त्यांचं कामकाज कंपन्यांच्या धर्तीवर करा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना.

- पुणे शहरात महापालिकेतर्फे सुरू असलेल्या विविध विकासकामांचा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडून आढावा.

- अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष राजगोपाल चिदंबरम यांचं मुंबईत निधन.

**आणि**

- ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या क्रिकेट कसोटीत भारताचा डाव संपुष्टात; ऑस्ट्रेलियाला विजयासाठी 162 धावांचे आव्हान.

**मोदी- ग्रामीण भारत**

ग्रामीण भारताचा विकास झाला तरच आपलं विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत केलं. ग्रामीण भारत महोत्सवाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं त्यावेळी मोदी यांनी ग्रामीण भारत हा विकास आणि संधीचं केंद्र व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. खेड्यापाड्यात राहणाऱ्या भारतीयांना सन्मानाचं जीवन जगता यावं हा प्रयत्न सरकार करत असल्याचं ते म्हणाले. आदिवासी विकासासाठी प्रधानमंत्री जनमन योजना सुरू करण्यात आली आहे, दारिद्र्य रेषेबाहेर आलेल्या 25 कोटी नागरिकांपैकी बहुतांश नागरिक ग्रामीण भागातले असल्याचं त्यांनी नमूद केलं. भारत मंडपम इथं सुरू झालेला ग्रामीण भारत महोत्सव हा भारताच्या ग्रामीण भागातली कला आणि संस्कृती यांचं दर्शन घडवणारा 6 दिवसांचा सोहळा आहे. उद्योजकतेतून महिला सक्षमीकरण यावर महोत्सवात भर देण्यात आला असून ईशान्य भारतावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे.

**फडणवीस- आढावा बैठका**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालही विविध विभागांच्या पुढील 100 दिवसांत करावयाच्या कामांचा आढावा घेतला. राज्यातल्या विविध नियोजन प्राधिकरणांचं सक्षमीकरण करुन त्यांचं कामकाज कंपन्यांच्या धर्तीवर करावं, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागाच्या नियोजन बैठकीत दिली. शहरातल्या पायाभूत विकासासाठी भांडवली गुंतवणूक करावीच लागेल; मात्र यासाठी निधी उभारण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक पर्याय शोधले पाहिजेत, असं मत फडणवीस यांनी व्यक्त केलं. राज्याच्या ग्रामीण भागासोबतच शहरी भागात विशेषत: मुंबईमधल्या झोपडपट्टी परिसरात कुपोषण मुक्तीची मोहीम प्रभावीपणे राबविण्यात यावी, अशा सूचना फडणवीस यांनी काल महिला आणि बालविकास विभागाला दिल्या. अंगणवाडी केंद्रातली स्वच्छतागृहं स्वच्छ ठेवणे, त्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे, नागरी बाल विकास केंद्र तातडीने सुरू करण्यावर भर द्यावा, अशाही सूचना फडणवीस यांनी केल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवताना प्रत्येक टप्प्यात केलेल्या कामगिरीचा आढावा घेणाऱ्या "द ईनसाईड स्टोरी ऑफ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" पुस्तकाचं प्रकाशन यावेळी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. महिला आणि बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव यांनी हे पुस्तक लिहीलं आहे. एमएमआरडीए क्षेत्रातली सर्व मेट्रोंची कामं पूर्ण होण्याचं वेळापत्रक नव्यानं तयार करा; पुढच्या वर्षीपासून दरवर्षी किमान 50 किलोमीटर मेट्रो कार्यान्वित होतील, असं नियोजन करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात एमएमआरडीएची आढावा बैठक काल फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते.

**मोहोळ**

पुणे शहरातील प्रकल्प महापालिका प्रशासनानं वेगानं पूर्ण करावेत;  शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असून त्यावर तातडीने कारवाई करून नागरिकांसाठी रस्ते मोकळे करावेत अन्यथा कडक कारवाई केली जाईल, असा इशारा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल प्रशासनाला दिला. पुणे शहरात महापालिकेतर्फे सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी मोहोळ यांनी महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांची भेट घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत मोहोळ बोलत होते.

**गोयल**

मुंबईला आंतरराष्ट्रीय दर्जाचं शहर बनवून वेगानं काम करु, अशी ग्वाही केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल मुंबईत दिली. मुंबईच्या नागरी सेवा-सुविधा विषयांबाबत झालेल्या आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत गोयल बोलत होते. उत्तर मुंबईला उत्तम मुंबई बनवण्यासाठी प्रस्तावित प्रकल्पांचा त्यांनी आढावा घेतला.

**कृषिमंत्री**

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या कृषिमंत्र्यांबरोबर नवी दिल्लीत चर्चा केली. शेतकरी आणि बाजारपेठ वेगवेगळ्या राज्यात असतील, तर वाहतूक आणि साठवण यांचा अतिरिक्त खर्च केंद्र सरकार उचलेल, असं

चौहान यांनी यावेळी सांगितलं. कृषी आणि संलग्न क्षेत्राच्या उत्पादन दरात वाढ होत असून शेतकरी सन्मान निधीपोटी सुमारे साडेतीन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरित केले असल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

**राज्याचे कृषीमंत्री**

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासमवेत नुकतीच दूरस्थ माध्यमातून चर्चा केली. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कांदा उत्पादक राज्य असून यातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते. त्यामुळे कांदा निर्यात मूल्य कमी करण्याची मागणी केल्याचं कोकाटे यांनी सांगितलं. तसंच आधुनिक डिजिटल सर्वेक्षण प्रणाली सुरू करून पीक विमा प्रक्रियेला गती देण्यात यावी या विषयावरही चर्चा झाली.

**कुपोषित बालके**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातल्या बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी एक अभिनव उपक्रम राबवला जात आहे. ऐकूया, याविषयी आमच्या प्रतिनिधीकडून ... . . . . . .

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्याच्या दुर्गम आणि आदिवासी भागांतील तीव्र कुपोषित बालकांना कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनानं पावलं उचलली आहेत. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा

कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंप्रेरणेनं प्रत्येकी दोन तीव्र कुपोषित बालके दत्तक घेतली आहेत. तर तालुकास्तरावरील तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पर्यवेक्षिका, सरपंच, मुख्याध्यापक, शिक्षक, पोलिस पाटील यांनी प्रत्येकी एक बालक दत्तक घेतलं आहे. अश्या 61 तीव्र कुपोषित बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी हे अधिकारी- कर्मचारी गृहभेटी देणार आहेत. तसंच शासनस्तरावरुन मिळाणाऱ्या आहारा व्यतिरिक्त पौष्टीक आहार पुरविणे, आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण करुन संदर्भ सेवा पुरविणे, वैद्यकीय सल्ल्यानूसार आवश्यक औषधे, शक्तीवर्धक गोळ्या स्वखर्चानं पुरविणे,  इत्यादी जबाबदारी हे दत्तक पालक घेतील आणि या तीव्र कुपोषित बालकांना साधारण श्रेणीमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करतील, अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी दिली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अहिल्यानगरहून मनोज सातपुते.

**मस्साजोग**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील दोन फरार आरोपींना बीड पोलीस दलाच्या विशेष पथकानं काल पुण्यात अटक केली. सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या दोघांना पुढील तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली. या प्रकरणातील एक संशयित सिध्दार्थ सोनवणे याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. या तीन आरोपींसह त्यांना सहकार्य करणारे डॉ.संभाजी वायबसे आणि त्यांची वकील पत्नी या दोघांना पोलिसांनी नांदेड इथून अटक केली होती. या सर्व आरोपींना केज इथल्या न्यायालयात काल हजर करण्यात आलं. न्यायालयानं या सर्वांना 14 जानेवारीपर्यंत

सीआयडी कोठडी सुनावल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे. दरम्यान, या हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ काल परभणीत सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला.

**लष्कर दिन**

लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आयोजित Know Your Army मेळाव्यामध्ये केंद्रीय संचार ब्यूरोचं, सैन्य विषयक माहिती देणारं एक दालन उभारण्यात आलं आहे. या बहुमाध्यम प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी भेट दिली. भारतीय लष्कराशी संबंधित छायाचित्र आणि माहिती देणारं हे प्रदर्शन आज सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुलं आहे.

**अधिवेशन**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेशाच्या 59 व्या अधिवेशनाची काल लातूरमध्ये सांगता झाली. तीन दिवसांच्या या अधिवेशनात युवकांना स्वयंरोजगार करता यावा तसंच रोजगार निर्मिती आणि उद्योजकतेकडे युवकांचा कल वाढवण्यासाठी सरकारने धोरण आखावं याबाबत प्रस्ताव संमत करण्यात आले. मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या निर्णयाची अनेक महाविद्यालये अंमलबजावणी करत नाहीत. राज्य सरकारने या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असा ठरावही या अधिवेशनात संमत करण्यात आला.

**चिदंबरम**

देशाच्या अणुऊर्जा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं काल पहाटे मुंबईत प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते 88 वर्षांचे होते. भारताला अण्वस्त्र सज्ज देश बनवण्यामध्ये चिदंबरम यांचा मोलाचा वाटा होता. देशातल्या दोन्ही अणू चाचण्यांमध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. केंद्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार, भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष यासारख्या अनेक जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. चिदंबरम यांना पद्मश्री आणि पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर चिदंबरम यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचव्या आणि अंतिम सामन्यात भारताचा दुसरा डाव 157 धावांवर संपुष्टात आला. ऑस्ट्रेलियापुढे जिंकण्यासाठी 161 धावांचे आव्हान ठेवण्यात आलं आहे.

**हवामान**

राज्यात आज हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**